आजचे घरकुल, करील भविष्य उज्वल !

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीचीकंपनी)
**CIN No. : U७०२००MH१९९८SGC११६६६४**
५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१
**दुरध्वनी क्र.** ०२२-६९२०६९२०
**ई-मेल :**sppl_mumbai@rediffmail.com

## अनिवासी गाळयांचा ई-लिलाव – २०२५

## अर्जदारांना नोंदणीसाठी, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व निकालाबाबतचे सुधारीत वाढीव ई-लिलाव वेळापत्रक

Website: https://eauction.spplmmr.org/eAuctionSpplMumbaiShops

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ई-लिलाव जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | दि. १०/१२/२०२५ | |
| २. | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करणे, कागदपत्रे अपलोड करणे, इत्यादिकरीता सुरुवात दिनांक व वेळ | दि.१०/१२/२०२५ | सकाळी ११.०० पासून |
| ३. | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेत स्थळावर अनामत रक्कम भरणे, अर्ज करणे, इत्यादीकरीता सुरुवात दिनांक व वेळ | दि.१३/१२/२०२५ | सकाळी ११.०० पासून |
| ४. | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे, इत्यादिकरीता अंतिम दिनांक व वेळ आणि पडताळणी | ~~दि.२८/१२/२०२५~~ **दि.१९/०१/२०२६** | रात्री ११.५९ पर्यंत |
| ५. | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) होण्याची दिनांक व वेळ | दिनांक ~~२२/१२/२०२५~~ **२४/०१/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता पासून ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत | |
| ६. | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) करीता अंतिम वेळेच्या शेवटच्या १० मिनिटामध्ये बोलीधारकाने बोली लावल्यास बोली लावण्याची वेळ १० मिनिटाने वाढविण्यात येईल. वाढीव १० मिनिटामध्ये पुन्हा कोणी बोली लावल्यास अंतिम वेळ पुन्हा १० मिनिटाने वाढविण्यात येईल. ही प्रक्रीया याचप्रमाणे पुढे शेवटची बोली लागेपर्यंत चालु राहील. | | |
| ७. | ई-लिलावचा एकत्रित निकाल लिलावाची बोली (बिडींग) संपल्यावर २ कार्यालयीन दिवसानंतर जाहीर करण्यात येईल. | | |
| ८. | ई-लिलाव एकत्रित निकाल जाहीर करण्याची दिनांक | ~~दि २४/१२/२०२५~~ **दि.३०/०१/२०२६** रोजी | सकाळी ११.०० वाजता |

विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक गाळयाचे विस्तृत विवरण, अटी व शर्ती तसेच ऑनलाईन अर्ज सूचना माहिती पुस्तिका इत्यादि सर्व माहिती www.spplmmr.org व https://eauction.spplmmr.org/eAuctionSpplMumbaiShops या संकेतस्थळावर दि. १०/१२/२०२५ रोजी पासून उपलब्ध आहे.

स्वाक्षांकित
**(अशोक नाईकवाडे)**
महाव्यवस्थापक (पणन)
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या.

# अनिवासी गाळयाचा संपूर्ण तपशिल

| अ. क्र. | संकेत क्रमांक | योजनेचे नाव | इमारत क्रमांक | दुकान क्रमांक | सामाजिक आरक्षण | सीटीएस क्रमांक | ऑफसेट किंमत | अनामत रक्कम १०% | चटई क्षेत्रफळ (चौ.मी) | जोते क्षेत्रफळ (त्रौ.मी) | भोगावटा प्रमाणपत्र | अक्षाश | रेखांश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १. | NR-२०४A | राहुलनगर शिवडी | २ | १ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३३९२५९२ | ३३९२५९ | ११.७१ | १२.८८ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २ | NR-२०४B | राहुलनगर शिवडी | २ | २ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २६०२३९२ | २६०२३९ | ८.९८ | ९.८८ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ३ | NR-२०४C | राहुलनगर शिवडी | २ | ३ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४०३००२० | ४०३००२ | १३.९१ | १५.३ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ४ | NR-२०४D | राहुलनगर शिवडी | २ | ४ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४०३००२० | ४०३००२ | १३.९१ | १५.३ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ५ | NR-२०४E | राहुलनगर शिवडी | २ | ५ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ६ | NR-२०४F | राहुलनगर शिवडी | २ | ६ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ७ | NR-२०४G | राहुलनगर शिवडी | २ | ७ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ८ | NR-२०४H | राहुलनगर शिवडी | २ | ८ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ९ | NR-२०४I | राहुलनगर शिवडी | २ | ९ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १० | NR-२०४J | राहुलनगर शिवडी | २ | १० | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| ११ | NR-२०४K | राहुलनगर शिवडी | २ | ११ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा योजना नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १२ | NR-२०४L | राहुलनगर शिवडी | २ | १२ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १३ | NR- | राहुलनगर | २ | १३ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०४M | शिवडी | | | | शिवडी वडाळा स्किम नं.५७ | | | | | | |
| १४ | NR-२०४N | राहुलनगर शिवडी | २ | १४ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १५ | NR-२०४O | राहुलनगर शिवडी | २ | १५ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १६ | NR-२०४P | राहुलनगर शिवडी | २ | १६ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १७ | NR-२०४Q | राहुलनगर शिवडी | २ | १७ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १८ | NR-२०४R | राहुलनगर शिवडी | २ | १८ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| १९ | NR-२०४S | राहुलनगर शिवडी | २ | १९ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २० | NR-२०४T | राहुलनगर शिवडी | २ | २० | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २१ | NR-२०४U | राहुलनगर शिवडी | २ | २१ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २२ | NR-२०४V | राहुलनगर शिवडी | २ | २२ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ४२०१२३० | ४२०१२३ | १४.५ | १५.९५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २३ | NR-२०४ W | राहुलनगर शिवडी | २ | २३ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | २९५५३४८ | २९५५३५ | १०.२ | ११.२२ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २४ | NR-२०४X | राहुलनगर शिवडी | २ | २४ | खुला प्रवर्ग | ७३ (भाग) शिवडी वडाळा स्किम नं.५७ | ३८१९३०० | ३८१९३० | १३.१८ | १४.५ | आहे | १९°००'१५.६०"N | ७२°५१'१७"E |
| २५ | NR-००१A | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-१ | १ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | १४२११०५१ | १४२११०५ | १५.२७ | १७.८३ | आहे | १९°०३'०२.१४"N | ७२°५६'२५"E |
| २६ | NR-००१B | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-१ | २ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | १४२११०५१ | १४२११०५ | १५.२७ | १७.८३ | आहे | १९°०३'०२.१४"N | ७२°५६'२५"E |
| २७ | NR-००१C | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-१ | ३ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | ११४४४९२ | ११४४४९ | १२.३ | १४.३६ | आहे | १९°०३'०२.१४"N | ७२°५६'२५"E |
| २८ | NR-००१D | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-१ | ४ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | १४२११०५१ | १४२११०५ | १५.२७ | १७.८३ | आहे | १९°०३'०२.१४"N | ७२°५६'२५"E |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | NR-००१E | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-१ | ५ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | १४२१०५१ | १४२१०५ | १५.२७ | १७.८३ | आहे | १९°०३'०२.१४"N | ७२°५६'२५"E |
| ३० | NR-००१F | तुर्भे मंडाले, मानखुर्द | एस-२ | ६ | खुला प्रवर्ग | ८० (भाग)/ ६/१ (भाग) | १४२१०५१ | १४२१०५ | १५.२७ | १७.८३ | आहे | १९°३'००.७७"N | ७२°५६'२१"E |

- **पात्रतेचे निकष**

  **१. ई-लिलाव प्रक्रीयेसाठी अर्ज सादर करण्याच्या दिवशी लिलावधारकांच वय १८ वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.**

  **२. लिलावधारकास एका गटामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाही. असे आढळल्यास असे अर्ज सोडतीपूर्वी रद्द करण्यात येतील.**

  **३. अर्ज सादर करतांना लिलावधारकास स्वत:च्या नावे बँक खाते क्रमांक आवश्यक आहे. दुसऱ्याचे खाते, एन.आर.आय. चालू खाते तसेच संयुक्त खाते क्रमांक वापरता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.**

  ४. **लिलावधारकाचे स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड असणे आवश्यक आहे. पात्रतेसाठी इतर अटी व शर्तीचा उल्लेख माहिती पुस्तिकेत विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आला आहे. माहिती पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती बोलीधारकांवर बंधनकारक आहेत. सर्व बोलीधारकांनी माहिती पुस्तिकेचा सखोल अभ्यास अर्ज भरण्यापूर्वी करावा. माहिती पुस्तिका व अर्ज शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित ऑनलाईन अर्ज भरण्याचे संकेतस्थळ** www.spplmmr.org **वर उपलब्ध राहील.**

  ५. **ई-लिलाव प्रक्रियेमध्ये समाविष्ट दुकाने / गाळयांबाबतची सविस्तर माहिती शिपुप्रमच्या संकेतस्थळा◌ावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध आहे.**

  ६. कंपनी / सहकारी गृहनिर्माण संस्थेला आधार कार्ड अनिवार्य नाही.

- **ई-लिलाव पद्धतीने अर्ज सादर करण्यासंबंधी सुचना**

  **१.** https://eauction.spplmmr.org/eAuctionSpplMumbaiShops या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर जाऊन लिलावासाठी नोंदणी करावी. सदर नोंदणीमध्ये कंपनी/ सहकारी संस्था व वैयक्तिक असे दोन प्रकार आहेत. त्यापैकी आपणास योग्य पर्याय निवडावा.

  **२.** नोंदणी पुर्ण झाल्यावर आपला मोबाईल क्रमांक व ई-मेलवर OTP प्राप्त होईल. सदर OTP संकेतस्थळावरील नोंदणी पृष्ठावर नोंदविण्यात यावा.

  **३.** वरील प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुन्हा मुख्य पृष्ठावर जाऊन लॉगईन करावे.

  **४.** लॉगईन केल्यानंतर मुख्य पृष्ठावरुन लिलाव पर्याय निवडावा.

  **५.** लिलावधारकाने नोंदणी केलेल्या घटकानुसार (वैयक्तिक अथवा कंपनी / सहकारी संस्था ) नोंदणी केल्यानंतर आवश्यक कागदपत्रे जसे की पॅनकार्ड, आधारकार्ड, डोमीसाईल प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे अपलोड करावी. त्यामध्ये दर्शविलेल्या यादीमधून आपण बोली लावण्यासाठी इच्छूक असलेल्या दुकानी गाळयाची निवड करावी.

६. गाळा निवडल्यानंतर सदर गाळ्यासाठी विहीत अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेटबँकिंग / आरटीजीएस / एनएफटी या पर्यायांचा वापर करावा. अन्यथा HDFC बँक, युनिट नं.1, टॉऊन सेंटर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) बँकेचा खाते क्रमांक **50200115333505**, **IFSC Code- HDFC0000592** जमा करावा.

७. सदर अनामत रक्कम प्रकल्पाचे एचडीएफसी बँक खाते क्र. **50200115333505** या खात्यावर जमा झाल्यानंतर आपण अनामत रक्क्म भरणा केलेल्या दुकानी गाळ्यांसाठी प्रारंभिक बोली लावू शकतात. (ही मुळ लिलाव प्रक्रीया नाही)

८. अनामत रक्कम यशस्वीरित्या भरणा केलेल्या अर्जदारांना अंतिम लिलावामध्ये सहभागी होता येईल.

९. ई-लिलाव प्रक्रीया संपल्यानंतर संकेतस्थळावर वेळापत्रकात नमुद केल्यानुसार ई-लिलाव निकाल जाहिर करण्यात येईल.

- **विशेष सुचना**

१. ई-लिलाव प्रक्रीयेसाठी आवश्यक अनामत रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे.
**ऑफसेट किंमतीच्या १०% इतकी असून प्रत्येक दुकानांच्या/गाळयाच्या समोरील कॉलम क्र. ९ मध्ये नमूद केलेली आहे.**

२. सदर योजनेतील वितरणास शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, महाव्यवस्थापक, विक्री, हस्तांतरण व गाळ्यांची अद्दलाबदल) विनियम १९८१ व (जमिनीची विल्हेवाट ) नियम १९८१ मधील तरतुदी जशाच्या तशा (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) लागू राहतील.

३. नियोजित प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व अनिवासी गाळ्यांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. अनिवासी गाळ्यांची किंमत परिगणीत करतांना वस्तू व सेवाकरांचा समावेश करण्यात आलेला नाही. भविष्यात वस्तू व सेवा कर आकारण्यात आल्यामुळे अनिवासी गाळ्यांची किंमत वाढल्यास सदर वाढीव किंमत भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी लिलावधारकाची राहील.

५. संगणकीय ई-लिलाव प्रक्रीयेत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. याकरीता लिलावाधारकांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभांना बळी पडू नये.

६. सदर ई-लिलावामध्ये बोलीधारकांना रु.१०,०००/-पटीने बोली लावणे आवश्यक आहे.

७. ई-लिलाव प्रक्रीयेच्या जाहिरातीच्या अनुषंगाने काही नविन सुचना असल्यास तसे https://eauction.spplmmr.org/eAuctionSpplMumbaiShops या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

८. सदर गाळयांवर कोणत्याही न्यायालयामध्ये दावा प्रलंबित असल्यास अथवा यापुर्वी वितरण झाले असल्यास पडताळणी अंती योग्य तो निर्णय घेण्यात येईल. सदर निर्णय अर्जदारास बंधनकारक राहील.

९. जाहिरातीमध्ये अनावधाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही लिलावधारकास फायदा घेता येणार नाही.

१०. पहिला लाभार्थी विहित कालमर्यादित गाळयांची सर्व रक्कम अदा करून ताबा घेण्यास असमर्थ ठरल्यास त्याच बोलीवर व्दितीय/ बोलीधारकास गाळा देण्याचे अधिकार शिपुप्रम यांना असतील.

११. न्युनतम रक्कमेपेक्षा कमी बोली लावल्यास तो बोलीधारक प्रक्रियेस अपात्र ठरेल.

**दुकान वितरणासाठी इतर महत्वाच्या अटी**

१. महानगरपालिकेचे सर्व कर पाणीपट्टी, मलनिस्सारण आकार, विज आकार इत्यादी लाभार्थीस त्या त्या स्थानिक संस्थांकडे परस्पर भरावे लागतील.

२. वितरीत झालेल्या अनिवासी गाळयांच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा अधिक्षक मुद्रांक शुल्क कार्यालय यांच्याकडे तसेच अनिवासी गाळयांचे आगाऊ वार्षिक सेवाशुल्क संबंधीत लेखाधिकारी यांचे कार्यालयाकडे अदा करावे लागतील. जर सदर अनिवासी गाळे असलेल्या गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत असेल तर सेवाशुल्काची बाब सदर गृहनिर्माण संस्थेशी संबंधीत राहिल. तसेच शासनाच्या धोरणानुसार / अधिसुचनेनुसार कंपनीने विक्रीकरीता काढलेल्या अनिवासी गाळयांस विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवाकर (Goods & Service Tax) लागू झाल्यास सदर कर संबंधीत कार्यालयाकडे भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच अनिवासी गाळयांचा ताबा दिला जाईल यांची कृपया नोंद घ्यावी. भविष्यात मुद्रांकित शुल्क (Stamp Duty) संबंधित गाळेधारकास भरणा करावा लागेल.

३. अनिवासी गाळयांच्या लिलावमधील अंतिम बोली रक्कमेच्या पूर्ण किंमतीचा भरणा केल्यानंतरच संबंधीत यशस्वी लिलावधारकास वितरणाची प्रक्रिया करण्यात येईल.

४. यशस्वी लिलावधारकांनी संबंधीत अनिवासी गाळयांसाठी रु. ५० लाखापेक्षा जास्त बोली रकमेच्या १% अतिरिक्त रक्कम टीडीएस स्वरूपात आयकर विभाग, भारत सरकारला भरणे बंधनकारक राहील.

५. इमारतींची सहकारी संस्था पंजीकृत झाल्यावर किंवा पंजीकृत असल्यास सदर सेवा व परिरक्षण शुल्क स्थानिक स्वराज्य संस्थेकडे भरणा करावयाच्या शुल्काची जबाबदारी इमारतीच्या सहकारी संस्थेची राहील. सदर सेवाशुल्कामध्ये महानगरपालिका व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्थेकडे प्रत्येक महिन्याला भरावयाची रक्कम, सामाईक विजबीलाची देयके व मालमत्ता कर आदीचा समावेश असले. मात्र दैनंदिन देखभालीसाठी लागणार खर्च प्रत्येक गाळेधारकाने स्वत: करावयाचा आहे. तथापि, संस्था कार्यरत नसल्यास गाळयाचे आवश्यक ती देखभाल करणे, शासनाच्या विविध कार्यालयाची देणी वेळोवेळी संबंधित कार्यालयाकडे भरण्याची जबाबदारी गाळेधारकाची राहिल.

६. अनिवासी घटकांचा वापर DCR २०३४ च्या नियम ३४ मधील तक्त्या ‘C’ (अनुक्रमांक १ ते ७४) मध्ये नमूद केलेल्या परवान्याच्या वापरांनुसारच करणे बंधनकारक आहे.

७. यशस्वी गाळेधारकांना जो उद्योग अथवा धंदा गाळयामध्ये सुरू करावयाचा आहे त्यासाठी लागणाऱ्या परवानगी/परवाना मंजूर इत्यादी बाबी स्वत: कराव्या लागतील. आवश्यक ते परवाने, मंजूरी अथवा

परवानगी न मिळाल्यास त्यातून उद्भवणारी कोणत्याही प्रकारची आर्थिक स्वरूपात वा इतर दायीत्वे यासाठी कंपनीस जबाबदार धरता येणार नाही.

८. वितरीत केलेल्या गाळयांमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल अथवा वादाचे बांधकाम महाव्यवस्थापक (पणन), शिपुप्रम यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

९. यशस्वी गाळेधारकांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार विक्री किंमतीवर विहीत मुद्रांक शुल्क E-SBTR व्दारे भरावे लागेल. याबाबतचे कागदोपत्री पुरावे महाव्यवस्थापक (पणन), शिपुप्रम यांना सादर करणे आवश्यक असेल त्याशिवाय गाळयांचे ताबापत्र देण्यात येणार नाही.

१०. शासनाचा कर भरणे बंधनकारक आहे. असे सर्व कर यशस्वी लिलावधारकास भरणे बंधनकारक राहतील.

११. जर यशस्वी निविदाधारकाने विहीत वेळेमध्ये गाळयांची रक्कम कंपनीस भरली नाही अथवा आपल्या देकारापासून माघार घेतली तर निविदाधारकाने भरलेली संपूर्ण अनामत रक्कम जप्त केली जाईल, यांची कृपया नोंद घ्यावी.

१२. सदर ई-लिलावाची वैधता ३१ मार्च २०२६ पर्यंत म्हणजेच रेडी रेकनर दर स्थिर असे पर्यंत ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

१३. यशस्वी लिलावधारकाने महाव्यवस्थापक (पणन)/शिपुप्रम यांना विनंती केल्यास कर्ज मिळण्यासाठी आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. परंतु त्यासाठी त्याने विक्री किंमतीच्या किमान २५% रक्कम कंपनीकडे भरणे आवश्यक राहील. थोडक्यात त्याला कमाल ७५% कर्जासाठी अर्ज करता येईल.

१४. सदरचे अनिवासी गाळे " जसे आहेत व जेथे आहेत तशा स्वरूपात " या तत्वावर विकण्यात येणार आहेत. लिलावधारकास अर्ज भरण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवर गाळयांची पाहणी करून निविदा भरणे आवश्यक / अपेक्षित आहे. तद्पश्चात अनिवासी गाळयांच्या सद्यस्थितीवरून (बांधकाम तथा दिशा) अर्ज रद्द करणे बाबत विनंती प्राप्त झाल्यास असे अर्ज ग्राहय धरता येणार नाही. तथा अशा लिलावधारकांची संपूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१५. जाहिरातील दर्शविण्यात आलेल्या विक्री किंमतीमध्ये अनिवासी गाळयाचे वार्षिक सेवाशुल्क समाविष्ट नाहीत. अनिवासी गाळयाचा ताबा घेण्यापूर्वी वार्षिक सेवाशुल्क लाभार्थ्यास कळविण्यात येईल. कळविण्यात आलेल्या सेवाशुल्काची (चालू मागणी आणि प्रलंबित शुल्क) संपूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे. सदर रक्कम भरल्यानंतरच अनिवासी गाळयाचा ताबा देण्यात येईल.

१६. सदर अनिवासी गाळे असलेल्या इमारतीचे गृहनिर्माण संस्था पंजीकृत असेल तर सेवाशुल्काची बाब सदर गृहनिर्माण संस्थेशी संबंधित राहिल. गृहनिर्माण संस्थेच्या नियमानुसार आपणास सेवाशुल्काची (चालू मागणी आणि प्रलंबित शुल्क) संपूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे.

१७. ई-लिलाव प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन अर्जाची किंमत रू. ५९००/- (अर्जाची किंमत रू.५०००)- अधिक १८% जीएसटी रू. ९००/- विनापरवाना) ई-लिलाव प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी एकूण ई-लिलाव प्रक्रीया शुल्क रू.११८०/- असेल. (प्रक्रीया शुल्क रू.१०००/- अधिक १८% जीएसटी रू. १८०/- विनापरवाना).

१८. व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांनी कोणतेही कारण न देता या अनिवासी गाळयांकरीता येणारे अर्ज स्विकारणे व नाकारणे किंवा सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवल आहेत.

१९. अनिवासी गाळयांच्या वितरणासाठी कंपनीने कोणताही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. लिलावधारकाने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करू नये. तसे केल्यास शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित/कंपनी कोणत्याही व्यवहारास फसवणूकीस जबाबदार राहणार नाही.

स्वाक्षांकित
**(अशोक नाईकवाडे)**
महाव्यवस्थापक (पणन)
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या